सा.बीड
# लक्ष्यवेध
अचुक लक्ष्य भेदणारे




संपादक : निलेश पुराणिक EDITOR- NILESH PURANIK Email Id- beedlakshyavedh@gmail.com

●वर्ष-३ रे ●अंक २२ ●मंगळवार दि.२८ एप्रिल २०२६ ●पाने ४ ●पोस्टल नंबर- L SB/Beed/RNP-255/2025-2027 ●आरएनआय नं.- MAHMAR/2023/89380 ● मुल्य २ रुपये

●Year-3 ●Paper- 22 ● Tuesday 28 April 2026 ●Page-4 ● Postal No. :- L SB/Beed/RNP-255/2025-2027 ● RNI :- MAHMAR/2023/89380 ● Price- 2 Rs.

# पुर्णवादी संकटावर मात करत पुन्हा उभारी घेईल

# बँकेबाबत ठेवीदारांचा सकारात्मक आशावाद कायम

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सहकार क्षेत्राने गेल्या काही वर्षांत अनेक चढ-उतार अनुभवले असले, तरी या पार्श्वभूमीवर पूर्णवादी नागरी सहकारी बँक ही संस्था सातत्याने विश्वास टिकवून ठेवत पुढे जात असल्याचे चित्र दिसत आहे. अनेक सहकारी बँका व पतसंस्था अडचणीत सापडल्या असतानाही, पूर्णवादी बँकेने विविध आर्थिक संकटांचा सामना करत स्वतःची घडी मजबूत ठेवली आहे. गेल्या काही दिवसांत जालना येथील कर्ज प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर चर्चांना उधाण आले असले, तरी बँक व्यवस्थापनाने तत्परतेने पावले उचलत पारदर्शकतेचा मार्ग स्वीकारला आहे. संबंधित प्रकरणात तक्रार दाखल करून कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, जबाबदारी निश्चित करण्याची भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. बँकेचा सुमारे १५३० कोटी रुपयांचा भक्कम व्यवसाय, विस्तृत शाखा जाळे आणि आधुनिक बँकिंग सुविधा या तिच्या मजबूत पायाभूत बाबी ठरल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही एकाच घटनेमुळे बँकेच्या एकूण स्थैर्यावर परिणाम होणार नाही, असा विश्वास जाणकार व्यक्त करत आहेत. दरम्यान, बँकेचे नेतृत्वही ठेवीदारांशी थेट संवाद साधत असून, सोशल मीडियाद्वारे केलेली आवाहने ही पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाचीच जाणीव करून देणारी असल्याचे मानले जात आहे. कठीण काळातही संवादाची दारे उघडी ठेवणे हीच विश्वासाची खरी ताकद असल्याचे मत व्यक्त होत आहे.आजच्या घडीला, आव्हानांच्या काळात ठामपणे उभे राहून विश्वास जपण्याची जबाबदारी पूर्णवादी नागरी सहकारी बँक पार पाडताना दिसत आहे. ठेवीदारांचा विश्वास, व्यवस्थापनाची सजग भूमिका आणि पारदर्शक कारभार या त्रिसूत्रीच्या बळावर बँक पुन्हा अधिक सक्षमपणे पुढे जाईल, असा आशावाद व्यक्त केला जात आहे.

मराठवाडा ते नाशिकपर्यंत विस्तार करत चार दशकांहून अधिक काळ ग्राहकांचा विश्वास संपादन केलेल्या पूर्णवादी नागरी सहकारी बँक समोर सध्या जालना शाखेतील कर्ज प्रकरणामुळे नव्या आव्हानांची मालिका उभी राहिली आहे. बँकेच्या कार्यपद्धती, जोखीम व्यवस्थापन आणि कर्ज पडताळणी प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.गेल्या ४१ वर्षांत २५ शाखांचे जाळे उभारून, एटीएम आणि कोअर बँकिंगसारख्या आधुनिक सुविधा उपलब्ध करून देत बँकेने ठेवीदारांचा भक्कम विश्वास कमावला होता. मात्र, जालना येथील तारण कर्ज प्रकरणात वेअरहाऊस मालाच्या पावत्यांवर आधारित व्यवहारांमध्ये अनियमिततेची शक्यता व्यक्त होत आहे.या संदर्भात बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी यांनी दि. २१ एप्रिल २०२६ रोजी जालना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, संबंधित व्यक्तींविरोधात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते. या प्रकरणात वेअरहाऊस मालक आणि काही कर्जदारांनी संगनमत करून बँकेची दिशाभूल केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. उपलब्ध माहितीनुसार, संबंधित ३२ खात्यांपैकी ९ खात्यांमधून वसुली पूर्ण झाली असली, तरी उर्वरित २३ खात्यांवर सुमारे ८ कोटी १३ लाख रुपयांची थकबाकी आहे. काही खात्यांवर वसुलीची प्रक्रिया सुरू असल्याचे बँकेकडून स्पष्ट करण्यात आले आहे, मात्र ही प्रक्रिया वेळखाऊ आणि गुंतागुंतीची असल्याचे मान्य केले जात आहे.बँकेचा एकूण व्यवसाय सुमारे १५३० कोटी रुपयांचा असल्याने या घटनेचा थेट आर्थिक परिणाम मर्यादित राहील, असा दावा व्यवस्थापनाकडून करण्यात येत आहे. तरीही, या प्रकरणामुळे ठेवीदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, बँकेच्या प्रतिमेवर परिणाम होत असल्याचे दिसून येते. दरम्यान, सहकार क्षेत्रात यापूर्वी इतरही काही सहकारी बँकेत अनियमितता आढळून आली होती तरी त्या बँका पुन्हा रिकव्हर झाल्या तशाच वाटचालीतून पुर्णवादी बँक जात आहे असा आशावाद ठेवीदार सोशल मिडीयावर व्यक्त करत आहेत.



**मुंबई/बीड**-वर्ष २०२५-२६ दरम्यान महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांसाठी प्राप्त अर्जांपैकी ९०% पेक्षा अधिक अर्जांचा विहीत कालावधीत निपटारा केल्याबद्दल मा. जिल्हाधिकारी बीड, मा. विवेक जॉन्सन यांचा आज मुंबई येथे मा. मुख्य सचिव महोदय व मा. मुख्य सेवा हमी आयुक्त महोदय यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.


# जिल्हा परिषद जागांवर बेकायदेशीर कब्जा; अधिकाऱ्यांवर संशयाची छाया

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेच्या मोक्याच्या जागांवर झालेल्या अतिक्रमण प्रकरणाने प्रशासनात खळबळ उडवली आहे. या प्रकरणी बांधकाम विभागातील संबंधित अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जाधवर यांनी उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंत्यांकडून स्पष्टीकरण मागवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषदेच्या मालकीच्या आणि भाड्याने दिलेल्या पेट्रोल पंपाच्या शेजारी बेकायदेशीर पोटभाडेकरू ठेवण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात काही अधिकाऱ्यांची मिलीभगत असल्याचा आरोप होत असून, यामुळे प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे. विशेष म्हणजे संबंधित पेट्रोल पंपाचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याची माहितीही समोर येत आहे.याशिवाय, जिल्हा परिषद मुख्य कार्यालयासमोर अनेक वर्षांपासून अतिक्रमण सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच बीड शहरातील नगररोडवरील जुन्या पंचायत समितीच्या जागेतही बेकायदेशीर बांधकामे करण्यात आल्याची बाब पुढे आली आहे. या सततच्या अतिक्रमणांमुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाभोवती संरक्षण भिंतीचे काम सुरू असतानाच हे अतिक्रमण प्रकरण समोर आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. प्रशासनाने संबंधित उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंत्यांना नोटीस बजावत तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. आता या प्रकरणात केवळ नोटीसपुरतेच मर्यादित न राहता प्रत्यक्षात अतिक्रमण हटविणे, जबाबदारी निश्चित करणे आणि दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांतून होत आहे.




## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामावर गंभीर प्रश्न

# काम अर्धवट, पैसे पुर्ण

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाली ते वरवटी रस्ता सुधारणा प्रकरणात गंभीर अनियमिततेचे आरोप समोर आल्यानंतर वातावरण तापले आहे. काम पूर्ण न करताच बिले उचलल्याच्या आरोपांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे पदाधिकारी सतीश शेळके, गणेश शिराळे, हरीभाऊ शेळके आणि योगेश टेकाळे यांनी उपअभियंता चंद्रकांत बोराडे यांना त्यांच्या कार्यालयात जाब विचारत घेराव घातला. अचानक झालेल्या या प्रकारामुळे विभागात खळबळ उडाली. अखेरीस संबंधित अधिकाऱ्यांनी चार दिवसांत अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले.

◄◄पान २ वर

**सा.बां.चे रवि तोंडे, चंद्रकांत बोराडे, अक्षय भागवत जबाबदार**
**शिवसेना पदाधिकाऱ्यांचा सोशल मिडीयावर आरोप**

## जिल्हाधिकारी यांच्याकडून कारवाईची अपेक्षा



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे प्रत्येक प्रश्नाची शहानिशा करुन स्वतः लक्ष देतात. जोपर्यंत एखाद्या माहितीची पडताळणी होत नाही तोपर्यंत ते समाधानी होत नाहीत दरम्यान शिवसैनिकांनी घातलेल्या घेरावामुळे बोराडे यांची चांगलीच धांदल उडाली. अखेर त्यांनी चार दिवसांत अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले. परंतू स्वतःच भ्रष्टाचारात सहभागी असलेले अधिकारी निष्पक्ष चौकशी करतील का? की दुध की रखवाली बिल्ली के हाथ मे असा प्रकार होईल त्यामुळे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः लक्ष घालून या प्रकरणातील पाळेमुळे शोधून काढावीत आणि दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी जोरदार मागणी होत आहे.

# संपादकीय

## अनधिकृत फेरीवाले : प्रशासनाची निष्क्रियता की व्यवस्थेचा पराभव?

राज्यातील प्रमुख शहरांमध्ये अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबईसारख्या शहरांमध्ये रेल्वे स्थानक परिसर आणि पदपथ फेरीवाल्यांनी व्यापल्याचे चित्र सर्वत्र दिसते. नागरिकांसाठी बनवलेले पदपथच व्यापले गेल्याने सामान्य माणसाला जीव मुठीत घेऊन रस्त्यावरून चालावे लागते. त्यामुळे फेरीवाला धोरण नेमके कोण राबवते आहे? हा प्रश्न आज सर्वसामान्यांना पडणे स्वाभाविक आहे. न्यायालयानेही या प्रश्नाची गंभीर दखल घेतली आहे. जुलै २०२४ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त करत, पोलिसांना अनधिकृत फेरीवाल्यांना हटवता येत नसेल, तर सैन्याला बोलवायचे का? असा संतप्त सवाल केला होता. मात्र, या ताशेऱ्यांनंतरही परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झालेली नाही, ही वस्तुस्थिती अधिक चिंताजनक आहे. शहरांतील वाढती लोकसंख्या, विकासकामांमुळे अरुंद झालेले रस्ते, वाढलेली वाहने आणि त्यात भर म्हणून पदपथांवर अतिक्रमण–या सगळ्यामुळे शहरांचा श्वास कोंडत आहे. फेरीवाल्यांनी रस्ते आणि पदपथ व्यापल्यामुळे वाहतूक कोंडी वाढते, अपघातांचा धोका निर्माण होतो आणि अधिकृत दुकानदारांवरही अन्याय होतो. कर भरणारे व्यापारी झाकोळले जातात, तर बेकायदेशीर व्यवसाय बिनधास्तपणे सुरू राहतात. प्रशासनाकडून अधूनमधून कारवाईचे दिखावे केले जातात; पण त्यांचा परिणाम तात्पुरताच असतो. कारवाईची माहिती आधीच मिळाल्याने फेरीवाले काही काळासाठी हटतात आणि पुन्हा त्याच जागी बस्तान मांडतात. यामागे स्थानिक स्तरावरचे आर्थिक हितसंबंध, राजकीय पाठबळ आणि यंत्रणांतील संगनमत असल्याच्या चर्चा वारंवार पुढे येतात. हीच बाब परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनवते. २०१७ मधील एल्फिन्स्टन (प्रभादेवी) स्थानक दुर्घटनेनंतर १५० मीटर परिसरात फेरीवाल्यांना मज्जाव करण्याचा नियम करण्यात आला होता. काही काळ तो अंमलातही आला; पण नंतर तो कागदावरच राहिला. यावरून प्रशासनाच्या सातत्यपूर्ण इच्छाशक्तीचा अभाव स्पष्ट दिसतो. या प्रश्नाकडे केवळ फेरीवाले हटवा या एकांगी दृष्टीने पाहणेही योग्य नाही. फेरीवाले हेही उपजीविकेसाठी संघर्ष करणारेच आहेत. त्यामुळे नियोजनबद्ध पुनर्वसन, ठरावीक झोन, परवाना व्यवस्था आणि कडक अंमलबजावणी यांचा समतोल साधणे गरजेचे आहे. मात्र, नियमांचे उल्लंघन आणि अराजकता याला कोणत्याही परिस्थितीत मोकळीक देता येणार नाही. सैन्याला बोलवण्याची वेळ येऊ नये, यासाठीच प्रशासन, पोलीस आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. न्यायालयाच्या सूचनांचे काटेकोर पालन, पारदर्शक धोरण आणि भ्रष्ट साखळीवर लगाम–याशिवाय या प्रश्नाचे उत्तर नाही. अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न हा केवळ अतिक्रमणाचा मुद्दा नसून तो शहरी व्यवस्थापन, कायद्याची अंमलबजावणी आणि प्रशासनाच्या विश्वासार्हतेची कसोटी आहे. ही कसोटी आता तरी यंत्रणांनी पार पाडली पाहिजे, अन्यथा नागरिकांचा संयम तुटण्यास वेळ लागणार नाही.

# सुख आणि सुविधा : जीवनाच्या प्रवाहातील दोन वेगळे किनारे



जीवनाच्या वाटेवर चालताना प्रत्येक माणूस एका अदृश्य शोधात असतो – तो शोध म्हणजे सुखाचा. परंतु या सुखाच्या शोधात आपण अनेकदा सुविधांच्या जंगलात हरवून जातो. आजचा काळ हा वेगाचा, स्पर्धेचा आणि साधनसंपत्तीचा काळ आहे. हातात स्मार्टफोन, घरात आधुनिक उपकरणे, दारात वाहन – सर्व काही उपलब्ध आहे. पण तरीही मनात एक पोकळी जाणवते. जणू काही सर्व काही असूनही काहीतरी कमी आहे. मराठीत एक म्हण आहे – सुख हे मनाचे, दुःखही मनाचे.

म्हणजेच बाह्य सुविधा आणि अंतर्गत समाधान यात मोठा फरक आहे. उर्दूत एक ओळ आहे – सुकून वो नहीं जो चीज़ों से मिले, सुकून वो है जो दिल से निकले. या एका वाक्यात संपूर्ण जीवनतत्त्वज्ञान दडलेले आहे. आजच्या युगात सुविधा म्हणजेच सुख असा गैरसमज समाजात वाढताना दिसतो. मोठे घर, महागडी कार, एसी ऑफिस – हेच सुखाचे मापदंड झाले आहेत. पण संत तुकाराम म्हणतात – आनंदेचे डोही आनंद तरंग, म्हणजे आनंद हा बाहेर नसून आपल्या अंतर्मनात आहे. हिंदी चित्रपटातील एक प्रसिद्ध ओळ आहे – ज़िंदगी बड़ी होनी चाहिए, लंबी नहीं. जीवनाची गुणवत्ता महत्त्वाची, केवळ साधनसंपत्ती नव्हे. सुविधा ही जीवन सुलभ करतात, पण त्या आनंद देतातच असे नाही. त्या केवळ बाह्य परिस्थिती सुधारतात; अंतःकरणातील शांतता मात्र वेगळी गोष्ट आहे.

मानवाने प्रगतीच्या नावाखाली सुविधा निर्माण केल्या. चूल–मातीपासून ते मायक्रोवेव्हपर्यंत, बैलगाडीपासून ते बुलेट ट्रेनपर्यंत – हा प्रवास निश्चितच अभिमानास्पद आहे. पण या प्रवासात आपण सुखाची व्याख्या बदलली. पूर्वी दोन वेळचे अन्न, कुटुंबाची साथ आणि मन:शांती यालाच सुख मानले जायचे. आज मात्र जितनी चादर हो उतने ही पैर फैलाओ ही साधी म्हण आपण विसरलो आहोत. अधिक मिळवण्याच्या हव्यासात आपण स्वतःलाच हरवत आहोत. उर्दू शायरीत एक ओळ आहे – हसरतें बढ़ती गईं, सुकून घटता गया. जितक्या इच्छा वाढतात तितका मनाचा शांतपणा कमी होत जातो.

सुविधा आणि सुख यांच्यातील मूलभूत फरक समजून घेणे आज अत्यंत आवश्यक आहे. सुविधा या बाह्य आहेत – त्या वस्तूंमध्ये, तंत्रज्ञानात आणि परिस्थितीत असतात. सुख मात्र अंतर्मनात असते – ते अनुभवावे लागते. एखाद्या गरीब माणसाकडे सुविधा नसतील, पण तो समाधानी असेल, तर तो खऱ्या अर्थाने सुखी आहे. याउलट, सर्व सुविधा असलेल्या व्यक्तीला जर मन:शांती नसेल, तर तो खऱ्या अर्थाने सुखी नाही. कबीरदास म्हणतात – माया मरी न मन मरा, मर मर गया शरीर. माणूस बाह्य गोष्टींमध्ये अडकून राहतो, पण अंतःकरणातील असंतोष संपत नाही.

आजच्या जीवनशैलीत आपण सतत धावत आहोत – अधिक पैसा, अधिक प्रतिष्ठा, अधिक सुविधा मिळवण्यासाठी. पण या धावपळीत आपण स्वतःलाच विसरत चाललो आहोत. मराठीत एक म्हण आहे – धावपळीत मन हरपलं. खरंच, या वेगवान जीवनात मनाला विश्रांती देण्याची गरज आहे. हिंदी गाण्यातील ओळ आठवते – ये दौलत भी ले लो, ये शोहरत भी ले लो, भले छीन लो मुझसे मेरी जवानी मगर मुझको लौटा दो बचपन का सावन. बालपणीचे साधे सुख, निरागस हसू – ही खरी संपत्ती होती, जी आजच्या सुविधांमध्ये हरवली आहे.



**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार, बीड

उर्दूतील एक सुंदर म्हण आहे – कम में भी गुज़ारा हो जाए, वही असली दौलत है. कमी गोष्टींमध्ये समाधान मानणे हीच खरी श्रीमंती आहे. पण आजचा समाज अधिक या शब्दाच्या मागे लागला आहे. अधिक पैसा, अधिक वस्तू, अधिक सुख – पण या अधिक च्या मागे धावताना आपण पुरेसे या शब्दाचा विसर पाडला आहे. संत ज्ञानेश्वरांनी सांगितले – जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे, म्हणजेच समाधान आणि ज्ञान वाटण्यात आहे, साठवण्यात नाही.

सुख आणि सुविधा यांचा समतोल साधणे हीच खरी जीवनकला आहे. सुविधा नाकारायच्या नाहीत, पण त्यांना सुखाचा पर्याय समजायचेही नाही. तंत्रज्ञानाचा उपयोग जीवन सुलभ करण्यासाठी करावा, पण त्याच्यात अडकून पडू नये. आज मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया – या सर्व सुविधा आहेत; पण त्यांच्यामुळे नाती दूर जात असतील, संवाद कमी होत असेल, तर त्या सुविधा आपल्याला सुखापासून दूर नेत आहेत. एक हिंदी ओळ आहे – रिश्तों में दूरी आ गई, स्क्रीन के करीब आते–आते. ही परिस्थिती आज प्रत्येक घरात दिसते.

खरे सुख हे साधेपणात असते. गावाकडच्या शांत वातावरणात, कुटुंबासोबत घालवलेल्या वेळेत, मित्रांसोबतच्या गप्पांमध्ये – हेच खरे आनंदाचे क्षण आहेत. उर्दू शायरीत म्हटले आहे – सादगी में जो मज़ा है, वो शानो–शौकत में कहाँ. साधेपणातील आनंद हा वैभवात मिळत नाही. मराठी गाण्यातील ओळही तेच सांगते – जीवनातली साधी सुखं, तीच खरी श्रीमंती.

आजच्या काळात मानसिक आरोग्याचा प्रश्न मोठा बनला आहे. कारण सुविधा वाढल्या, पण समाधान कमी झाले. स्पर्धा, अपेक्षा, तुलना – या गोष्टींनी मनावर ताण वाढवला. सुखाचा शोध घेताना आपण स्वतःलाच हरवत आहोत. म्हणूनच आज गरज आहे ती स्वतःकडे परत येण्याची. स्वतःला समजून घेण्याची, आपल्या गरजा आणि इच्छा यामध्ये फरक ओळखण्याची.

महात्मा गांधी म्हणाले होते – पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा पूर्ण करू शकते, पण प्रत्येकाच्या हव्यासासाठी नाही. ही ओळ आज अधिक महत्त्वाची वाटते. सुविधा ही गरज भागवण्यासाठी असावी, हव्यास वाढवण्यासाठी नव्हे. सुख हे मिळवायचे नसते, ते अनुभवायचे असते. ते बाहेर शोधायचे नसते, ते आत सापडते.

शेवटी, सुख आणि सुविधा या दोन वेगळ्या गोष्टी आहेत – एक बाह्य, दुसरे अंतर्मनातील. सुविधा जीवन सुलभ करतात, पण सुख जीवन अर्थपूर्ण करते. म्हणूनच जीवनाच्या प्रवासात सुविधा मिळवा, पण सुख हरवू देऊ नका. मन प्रसन्न असेल तरच जीवन सुंदर वाटते – ही साधी गोष्ट लक्षात ठेवली, तरच खऱ्या अर्थाने आपण सुखी होऊ शकतो.

# ‘मुर्तिमंत ज्ञान म्हणजेच ज्ञानेश्वर महाराज’– डॉ. विक्रम महाराज सारूक




**बीड । प्रतिनिधी**

मनुष्याला संसारातून मुक्त होण्यासाठी कर्म, उपासना, योग आणि ज्ञान ही चार साधने आहेत; मात्र मोक्षप्राप्तीसाठी ज्ञानच सर्वोच्च साधन आहे. ज्ञान हाच देव असून ‘ज्ञानेश्वर’ या नावाचा तोच अर्थ आहे. त्यामुळे मुर्तिमंत ज्ञान हेच ज्ञानेश्वर महाराजांचे स्वरूप आहे, असे प्रतिपादन डॉ. विक्रम महाराज सारूक यांनी केले.बीड येथील इंद्रप्रस्थ कॉलनीतील श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान येथे संत भगवानबाबा, संत वामनभाऊ, संत तुकाराम महाराज, विठ्ठल–रुक्मिणी व हनुमान यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठेच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित त्रिदिवसीय हरिनाम सप्ताहात ते कीर्तन करत होते. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. राजेंद्र भाऊ सानप यांनी केले. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून ज्ञानेश्वर महाराजांचे वर्णन करताना सारूक म्हणाले की, ज्ञानेश्वर महाराज हे साधकांना मोक्षदायी आहेत. ‘ज्ञानदेव’ या नावातच ज्ञान आणि देव यांचा संगम आहे. त्यांच्याकडे असलेले ज्ञान हे शुद्ध असून अज्ञानाचा लवलेशही नाही. त्यामुळे सर्व संतांनी त्यांच्या कार्याचे गौरवपूर्ण वर्णन केले आहे. ज्ञानेश्वर महाराजांच्या सहवासातून व त्यांच्या वाचनातून मन आणि परिसर पवित्र होतो, तसेच जीवनात योग्य संस्कार घडतात. लहान वयापासूनच असे संस्कार दिल्यास जीवन कृतार्थ होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले. गेल्या १४ वर्षांपासून प्रतिष्ठानतर्फे सातत्याने ज्ञान सोहळ्याचे आयोजन होत असल्याबद्दल आयोजक डॉ. राजेंद्र भाऊ सानप व त्यांच्या सहकाऱ्यांचे त्यांनी कौतुक केले.या कीर्तनात श्रीराम सानप, किशनराव माने, नामदेव मुंडे, श्रीहर्ष धांडे, वैभव येडे, आश्रुबा सानप, पवन ढाकणे, विजय वीर, राजेंद्र घोलप यांनी गायनाची साथ दिली, तर मृदंगाचार्य अक्षय घोलप यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाला अनेक मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## काम अर्धवट

दरम्यान, या प्रकरणात संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भूमिकेबाबत सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, निष्पक्ष चौकशीची मागणी जोर धरत आहे. काम अपूर्ण असताना बिले कशी मंजूर झाली?, प्रक्रियेतील कोणकोणत्या टप्प्यांवर त्रुटी झाल्या? आणि यामागे नेमका कोणाचा दबाव होता का? असे अनेक सवाल उपस्थित होत आहेत.

तक्रारदारांनीही प्रशासनावर नाराजी व्यक्त करत, तक्रार करूनही पाहणी होत नसेल तर आम्ही कुणाकडे जायचे? असा सवाल उपस्थित केला आहे. अधिकारी मुद्दाम टाळाटाळ करत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः लक्ष घालून सखोल चौकशी करावी, दोषींवर कडक कारवाई करावी आणि भविष्यात अशा प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी नागरिक व पदाधिकाऱ्यांकडून होत आहे.

# जनगणना २०२७ प्रशिक्षणाला वेग वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

आगामी जनगणना २०२७ प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यात प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षणाला वेग आला असून २४ एप्रिल रोजी आयोजित प्रशिक्षण सत्रात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन प्रशिक्षणाची पाहणी केली व प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.



नगर रोड परिसरातील प्रशिक्षण केंद्रात आयोजित सत्रामध्ये निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी शिवकुमार स्वामी तसेच उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा जनगणना अधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी उपस्थित राहून प्रशिक्षणाची प्रगती तपासली . यावेळी त्यांनी वर्गात प्रत्यक्ष बसून प्रशिक्षणाची पद्धत , विषय मांडणी व प्रात्यक्षिके यांचा आढावा घेतला. प्रशिक्षण अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सुरू असून प्रगणक व पर्यवेक्षक एकाग्रतेने मार्गदर्शन ऐकत आहेत . डिजिटल सादरीकरण , फळ्यावरचे प्रात्यक्षिक आणि प्रत्यक्ष संवाद या माध्यमातून प्रशिक्षण दिले जात आहे . प्रशिक्षणार्थींनीही विविध प्रश्न विचारत सक्रिय सहभाग नोंदवला.यावेळी शिवकुमार स्वामी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की , जनगणना ही देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे . प्रत्येक प्रगणकाने आपली जबाबदारी समजून अचूक व पारदर्शक माहिती संकलित करावी . नागरिकांशी विश्वासपूर्वक संवाद साधणे ही यशस्वी जनगणनेची गुरुकिल्ली आहे. तसेच शैलेश सूर्यवंशी यांनी सांगितले की , प्रशिक्षण काळात प्रत्येक बाब सखोल समजून घेणे आवश्यक आहे. जनगणना ही केवळ आकडे गोळा करण्याची प्रक्रिया नसून प्रशासनाच्या नियोजनाचा पाया आहे . त्यामुळे अचूकता , वेळेचे नियोजन आणि डिजिटल साधनांचा योग्य वापर अत्यंत महत्त्वाचा आहे . प्रशिक्षणामध्ये घरांची माहिती, कुटुंब रचना , मूलभूत सुविधा , तांत्रिक साधनांचा वापर तसेच डिजिटल पद्धतीने माहिती नोंदविणे या बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. प्रत्यक्ष उदाहरणे व प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रक्रिया समजावून सांगितली जात आहे.एकूणच , बीड जिल्ह्यात जनगणना २०२७ साठी प्रशासनाने भक्कम तयारी केली असून प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रगणक व पर्यवेक्षक सक्षम बनवले जात आहेत . या प्रक्रियेमुळे आगामी जनगणना अधिक प्रभावी , अचूक आणि पारदर्शक होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# जिल्ह्यात 'जागतिक हिवताप दिन'निमित्त जनजागृतीचे
# जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे यांचे आवाहन




**बीड । प्रतिनिधी**

**दरवर्षी २५ एप्रिल हा दिवस वर्ल्ड मलेरिया डे अर्थात जागतिक हिवताप दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त संपूर्ण एप्रिल महिना हिवताप जनजागृती महिन्याच्या स्वरूपात साजरा करण्यात येत असून नागरिकांमध्ये हिवतापाविषयी जागरूकता निर्माण करणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे आणि लोकसहभाग वाढविणे हा मुख्य उद्देश आहे.**

जिल्हा हिवताप अधिकारी श्री. विजयसिंह शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यात मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये डास अळी सर्वेक्षण, अबेटिंग, जलद ताप सर्वेक्षण तसेच डास अळी भक्षक गप्पी मासे सोडणे यांचा समावेश आहे. आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर यांच्या माध्यमातून गावपातळीवर सक्रिय काम सुरू आहे.

यासोबतच ग्रामपंचायत व नगर परिषद यांच्या सहकार्याने स्वच्छता उपक्रम राबविणे, संडासच्या व्हेंट पाईपला जाळ्या बसविणे, तसेच गटसभा, शालेय आरोग्य शिक्षण व माता बैठकींद्वारे जनजागृती केली जात आहे.

केंद्र शासनाने सन २०३० पर्यंत मलेलिरया निर्मूलनाचे लक्ष्य ठेवले असून, त्यानुसार बीड जिल्ह्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

हिवतापाची लक्षणे :

थंडी वाजणे, ताप येणे, हुडहुडी भरणे, अंगदुखी, डोकेदुखी, उलटी होणे, तसेच ताप आल्यानंतर घाम येऊन थकवा जाणवणे ही प्रमुख लक्षणे आहेत. ताप एक किंवा दोन दिवसांच्या अंतराने येऊ शकतो. वेळेत उपचार न घेतल्यास हा आजार गंभीर ठरू शकतो.

बीड जिल्ह्यातील स्थिती (मागील दोन वर्षे):

२०२४ : ४,२९,२०४ रक्त नमुने तपासले, रुग्ण आढळले नाहीत

२०२५ : ५,०२,९९२ नमुने, ६ रुग्ण आढळले

२०२६ (मार्च अखेर) : १,२१,२५६ नमुने, २ रुग्ण आढळले

आरोग्य विभागाने भविष्यात हिवतापाचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी नियोजन केले असून नागरिकांनी खालील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

प्रतिबंधात्मक उपाय :

घराभोवती पाणी साचू देऊ नये

पाण्याचे साठे आठवड्यातून एकदा रिकामे करून स्वच्छ करावेत

खड्डे बुजवून पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी

झोपताना पूर्ण अंग झाकेल असे कपडे वापरावेत

मच्छरदाणी व खिडक्यांना जाळ्या लावाव्यात कुलर, टाकाऊ वस्तू, टायर, भांडी यामध्ये पाणी साचू देऊ नये

आरोग्य विभागाने दिलेल्या सूचनांचे पालन केल्यास डासांची उत्पत्ती रोखता येईल आणि हिवतापासारख्या आजारांपासून बचाव होईल. त्यामुळे सर्व नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## खानापूर ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच अपात्रतेच्या आदेशाला खंडपीठात स्थगिती

**बीड । प्रतिनिधी**

दि.२३ : 'बकरे की माँ कब तक खैर मनाएगी' अशी अवस्था खानापूर ग्रामपंचायतीच्या पदाधिकार्यांबाबत झाली आहे. जिल्हाधिकार्यांनी पंडित आबूज आणि सोजरबाई क्षीरसागर यांना सरपंच, उपसरपंच पदावरून अपात्र घोषित केल्यानंतर विभागीय आयुक्तांनी देखील जिल्हाधिकार्यांचा आदेश कायम ठेवत स्थगिती देण्यास नकार दिला होता. त्यानंतर या दोघांनीही मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात स्थगिती अपिल दाखल केले होते. यात खंडपीठाने जिल्हाधिकार्यांनी दिलेल्या अपात्रता आदेशाला तात्पुरती स्थगिती दिली आहे. शिवाय विभागीय आयुक्तांकडे प्रलंबित असलेल्या अपिलावर चार आठवड्यात अंतिम निर्णय द्यावा, असे आदेश पारित केले आहेत. म्हणजेच या दोघांनाही महिनाभराचा दिलासा आहे. याबाबत अपिलकर्ते विकास खंडू कांबळे म्हणाले, खंडपीठाचा स्थगिती आदेश म्हणजे कायमस्वरूपी पदावर बसण्याचा अधिकार नाही. महिनाभरानंतर का होईना दोघांनाही पदावरून पाय उतार व्हावंच लागणार असल्याचे ते म्हणाले.

खानापूर ग्रामपंचायतीच्या राजकारणात पत्रकार बालाजी मारगुडे आणि जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती कल्याण आबुज यांच्यात राजकीय सामना आहे. २०२३ साली झालेल्या निवडणुकीत आबुज यांच्या पॅनलने विजय मिळवला होता. त्यासाठी माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी आपली प्रतिष्ठा आबुज यांच्यासाठी पणाला लावली होती. विधानसभेच्या आमदाराने थेट छोट्याश्या ग्रामपंचायतीत लक्ष घातल्याने संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष या निवडणुकीकडे लागले होते. निकालानंतर विकास खंडू कांबळे यांनी सरपंच, उपसरपंच यांच्या निवडीवर आक्षेप घेतला. या दोघांनी देखील उद्यानासाठी राखीव असलेल्या ५ एकर भुखंडावर प्लॉटींग पाडून ते विकले होते. तर काही फ्लॉट स्वतःसाठी ठेवलेले होते. हा संपूर्ण प्रकार ग्रामपंचायतीच्या रेकॉर्डवर आहे. जेव्हा जिल्हाधिकार्यांकडे अपिल झाले तेव्हा अतिक्रमण तपासण्यासाठी बीडीओच्या नेतृत्वात विस्तार अधिकार्यांनी गावात येऊन प्रत्यक्ष पाहणी करीत ग्रामपंचायतीच्या अभिलेखाची देखील तपासणी केली होती. त्यांनी दिलेल्या अहवालात अतिक्रमण असल्याचे आणि अभिलेखात व्हाईटनर लावून खाडाखोड केल्याचे स्पष्टपणे नमूद आहे. जिल्हाधिकार्यांनी देखील हा प्रकार गंभीर असल्याचे आपल्या निकाल पत्रात म्हटले होते. त्यावरूनच पंडित आबूज आणि सोजरबाई क्षीरसागर यांना अपात्र घोषित केले होते. जिल्हाधिकार्यांच्या या निर्णयाला स्थगिती मिळावी यासाठी त्यांनी विभागीय आयुक्तांकडे स्थगिती अपिल दाखल केले होते. मात्र विभागीय आयुक्तांनी देखील आबुज आणि क्षीरसागर यांनी केलेले कारनामे पाहून स्थगितीस नकार दिला होता. त्यानंतर त्यांनी खंडपीठात स्थगिती मिळवण्यासाठी अर्ज केला. इथे त्यांना न्यायमुर्ती एस.जी. चपळगावकर यांनी तात्पुरता म्हणजेच चार आठवड्यांचा दिलासा दिलेला आहे. शिवाय विभागीय आयुक्तांनी हे अपिल चार आठवड्यात निकाली काढावे असे आदेशीत केले आहे. त्यामुळे कल्याण आबुज गटाला आजचे मरण उद्यावर एवढ्याच साठी आनंद व्यक्त करता येईल, असे विकास खंडू कांबळे यांनी म्हटले आहे.

## महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभाल, दुरूस्तीचे पूर्वनियोजित कामे आता सकाळच्या सत्रात होणार

**बीड । प्रतिनिधी**

उन्हाळ्यात विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेशी संबंधित विविध देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सध्या वेगात सुरु आहे. मात्र उन्हाचा तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे संबंधित दिवशी सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करावेत असे निर्देश मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना शनिवारी (दि. २५) देण्यात आले.

महावितरणची प्रामुख्याने पावसाळ्यात वीजयंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी तसेच वीजपुरवठा खंडित होणे व वीजसुरक्षेचे धोके टाळण्यासाठी वीज ग्राहकांना पूर्वसूचना देऊन देखभाल व दुरूस्तीचे काम वीजराज्यभरात सध्या सुरु आहे. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस सर्व कामे पूर्णत्वास जातात. मात्र सद्यस्थितीत सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. नागरिकांसाठी ही गैरसोयीची वेळ टाळण्यासाठी यापुढे संबंधित दिवशी व वीजवाहिनीच्या पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्तीचे काम यापुढे सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करण्याचे निर्देश मुख्यालयाकडून देण्यात आले आहे. महावितरणच्या देखभाल दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे करताना सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याचे तसेच संबंधित वीजग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे तसेच प्रसिद्धी माध्यमांद्वारे कळविण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

मान्सूनपूर्व देखभाल व दुरूस्तीच्या पूर्वनियोजित कामांमध्ये प्रामुख्याने वीजवाहिन्यांना स्पर्श करणाऱ्या झाडांच्या छोट्या फांद्या तोडणे, तूटलेले पीन व डिस्क इन्सूलेटर्स बदलणे, वितरण रोहित्रे, फिडर पिलर, रिंगमेन युनिटचे अर्थिंग तपासणे, ऑइल फिल्टरेशन व ऑइल टॉपिंग अप, रोहित्राच्या वितरण पेटीची दुरुस्ती, नादुरुस्त लाईटनिंग अरेस्टर बदलणे, वीजखांब व तारांचे मजबुतीकरण, तारांमधील झोल काढणे, गंजलेले किंवा खराब झालेले वीजखांब बदलणे, जुन्या वीजतारा बदलणे, फिडर पिलरची साफसफाई व आवश्यकतेनुसार इन्सूलेशन स्प्रे मारणे, उच्च व लघुदाब वीजतारांना गार्डिंग करणे यासह उपकेंद्रातील ब्रेकर्सची दुरुस्ती, बॅटरी चार्जिंग, पॉवर ट्रान्सफॉर्मरची देखभाल व ऑइल टॉपिंग अप अशा व इतर विविध दुरुस्ती कामांसह वीजपुरवठ्याच्या पर्यायी यंत्रणा सज्ज करणे आदी कामे करण्यात येत आहेत.

## सहयोगनगर येथील गजानन महाराज मंदिरात शिवलिंग चलप्राणप्रतिष्ठा उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

वैशाख शुक्ल सप्तमी व गंगा उत्पत्ती दिनाच्या पावन मुहूर्तावर गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी शहरातील सहयोगनगर येथील श्री गजानन महाराज मंदिरात 'श्रीमहादेव-श्रीनंदी' यांसह 'हरीहर शिवलिंग'चा भव्य चलप्राणप्रतिष्ठा सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



या विशेष शिवलिंगामध्ये ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे एकत्रित दर्शन घडत असल्याने भाविकांमध्ये विशेष आकर्षण व उत्सुकता पाहायला मिळाली. पहाटे ५.३० वाजल्यापासून धार्मिक विधींना प्रारंभ झाला. श्रीगणेश, श्रीविठ्ठल-रुख्मिणी, श्रीगजानन महाराज, श्रीगुरुदेव दत्त व श्रीराम पंचायतन दैवतांच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यानंतर सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत 'हरीहर शिवलिंग'वर वेदमंत्रांच्या गजरात रुद्राभिषेक करण्यात आला. मंदिर परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. दुपारी १२ वाजता महाआरती करण्यात आली आणि त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.या सोहळ्यास सहयोगनगर व परिसरातील मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती लावून दर्शनाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन श्री गजानन सांस्कृतिक मंडळ, सहयोग नगर, बीड यांच्या वतीने उत्कृष्टरीत्या करण्यात आले.

## विद्यार्थ्यांचे शुल्क सहा टक्के व्याजासह परत करा-ना.पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालय यांच्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालाच्या आधारे विद्यार्थ्यांची बाजू न्याय्य ठरवत संबंधित महाविद्यालयास विद्यार्थ्यांकडून वसूल केलेले शुल्क सहा टक्के व्याजासह परत करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले आहेत. विद्यार्थी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत पुणे येथील आय,एल,एस, विधि महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांकडून करण्यात आलेल्या बेकायदेशीर शुल्क वसुलीप्रकरणी राज्य शासनाने ही भूमिका घेतली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, पुणे येथील अशासकीय अनुदानित महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून अपारदर्शक पद्धतीने व बेकायदेशीर शुल्क आकारणी करण्यात आल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार उच्च शिक्षण विभागाने सह संचालक (उच्च शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समितीची स्थापना करून सखोल चौकशी केली. या चौकशीअंती सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार, संबंधित महाविद्यालयाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१ (७) च्या तरतुदींचे उल्लंघन करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांची पूर्वमान्यता न घेता शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२४-२५ दरम्यान विद्यार्थ्यांकडून अनधिकृत शुल्क वसूल केले असल्याचे स्पष्ट झाले आहे. १७ विविध शीर्षकांखाली एकूण १,०४,८६३/- रुपये इतकी रक्कम बेकायदेशीररित्या वसूल करण्यात आल्याचे आढळून आले आहे. उच्च शिक्षण संचालनालयामार्फत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयाद्वारे संबंधित महाविद्यालयास ही रक्कम फी भरल्याच्या दिनांकापासून सहा टक्के व्याजदराने संबंधित विद्यार्थ्यांना परत करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले. राज्यातील इतर महाविद्यालयांमध्येही विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी होत असल्यास त्याची शहानिशा करून अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण आणि महाविद्यालयांमधील शुल्क निर्धारण प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

## जिल्ह्याला पिक विम्यातून वगळणे हे षडयंत्रच तात्काळ उपाय योजना करा

### प्रा.सुशीला मोराळे यांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

पिक विमा प्रश्नावर बीड जिल्हा हा सतत या ना त्या कारणांमुळे चर्चेत असतो, यापूर्वी सर्वात जास्त पिक विमा भरणारा व पिक विमा मिळणारा जिल्हा म्हणून बीड जिल्ह्याची ख्याती आहे, आता हा विमा मिळणार की नाही याबाबत संभ्रम आहे. कायमच विमा कंपन्यांच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांना वेळेवर विमा मिळू शकलेला नाही. २०२० चा पिक विमा अजूनही प्रलंबितच आहे, यापूर्वीच्या कंपन्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकून नव्या कंपन्यांना हे कंत्राट दिले तरीही यावर्षीचा विमा मिळणार नाही शासनाने तातडीने याबाबत निर्णय घेऊन विमा कंपन्यांना विमा देण्यास भाग पाडावे अशी मागणी किसान संघर्ष समितीच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केली आहे.

पिक विमा क्षेत्रात बीड जिल्हा हा आदर्श मॉडेल म्हणून ओळखला जात आहे मात्र यावर्षीचा पिक विमा बीड लातूर धाराशिव या मराठवाड्यातील कायम दुष्काळी पट्ट्यातील शेतकरी विमा पासून वंचित राहणार आहेत. जिल्ह्याला सप्टेंबर २०२५ मध्ये अतिवृष्टीचा फार मोठा फटका बसला होता. शेती आणि शेतकरी उध्वस्त झाला नेत्यांचे दौरे झाले आश्वासने दिली गेली मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना काहीच हाती लागले नाही.

नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला सरकारने ८ हजार प्रति हेक्टर, रब्बीसाठी १० हजार प्रति हेक्टर, आणि पिक विमा देण्याची गॅरंटी दिली होती मात्र शेतकऱ्यांच्या तोंडाला सरकारने पाने पुसली आहेत. सरकारने तात्काळ पीक विम्यासाठी उपाययोजना करावी नसता आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा किसान संघर्ष समितीच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी दिला आहे.

## जनगणना २०२७ चा पहिला टप्पा महाराष्ट्र दिनी १ मे रोजी सुरुवात राज्यात घरसूची आणि घरगणना

**बीड । प्रतिनिधी**

जनगणना २०२७ च्या टप्पा १ अंतर्गत घरसूची आणि घरगनणा १ मे २०२६ पासून सुरु होणार आहे या पार्श्वभूमीवर जिल्हयातील सर्व तहसील तसेच नगरपालीका क्षेत्रात व्यापक प्रसिध्दी उपक्रम घेण्यात यावेत असे आवाहन जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी एका पत्राव्दारे केले आहे.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून हे काम सुरु करण्यात येत आहे. महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमा याची विशेष प्रसिध्दी करण्याच्या सूचना याव्दारे देण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्या कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

# विधानपरिषदेसाठी रणरागिणी डॉ. स्नेहा सोनकाटे यांना संधी द्या



**बीड । प्रतिनिधी**

ओबीसी आंदोलनातील उगवता चेहरा म्हणून राज्यात परिचित झालेल्या डॉ. स्नेहा सोनकाटे यांना विधानपरिषदेत संधी द्यावी, अशी मागणी राज्याच्या कानाकोपऱ्यातून वाढताना दिसत आहे. भटके विमुक्त, बहुजन आणि ओबीसी समाजातील बांधवांकडून या मागणीला मोठा पाठिंबा मिळत आहे. तरी

भारतीय जनता पक्षाच धोरण महिलांच्या हिताचे असून या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,ना गिरीश महाजनजी, ना चंद्रशेखर बावनकुळे , जयकुमार गोरे गोदा ते नर्मदा जल उत्सव यात्रेचे प्रणेते राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे रगरागिनिला नक्कीच न्याय देतील अशी अशा आणि अपेक्षा बहूजन समाजाला आहे. बहुजन समाजातील तळागाळातील महिलांना दिशा व न्याय देण्यासाठी कार्यरत असलेल्या डॉ. सोनकाटे यांनी स्वतःच्या कर्तृत्वावर नेतृत्व निर्माण केले आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना विधानपरिषदेत स्थान मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. महिलांच्या हिताचे धोरण राबवणाऱ्या सरकारकडून त्यांच्या कार्याला योग्य न्याय मिळेल, अशीही भावना व्यक्त केली जात आहे.

वैद्यकीय व्यवसाय सांभाळताना त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. विविध आंदोलनांमध्ये सहभाग नोंदवून तसेच शासनाशी समन्वय साधून अनेक प्रश्न सोडवले आहेत. धनगर समाज आंदोलनाच्या काळात त्यांनी समन्वय साधत तणाव कमी करण्यासाठी भूमिका बजावली.

महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य आणि बहुजन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने काम केले आहे. ओबीसी समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी अथक प्रयत्न केले असून त्यांच्या प्रभावी संवादशैलीमुळे त्यांना 'बहुजन रणरागिणी' अशी ओळख मिळाली आहे.राज्यभरातील बहुजन नेते, कार्यकर्ते आणि नागरिकांकडून या मागणीला दुजोरा मिळत आहे. डॉ. सोनकाटे यांसारख्या अभ्यासू आणि समर्पित नेतृत्वाला विधानपरिषदेत संधी मिळणे हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल, असे मत व्यक्त होत आहे. विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही मागणी अधिक तीव्र होत असून, बहुजन समाजातून त्यांना राजकीय व्यासपीठ मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बीडमध्ये तीन बालविवाह प्रकरणांत गुन्हे दाखल

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (–क्ष्ण) पथकाने प्रभावी कारवाई करत एका आठवड्यात तीन बालविवाह प्रकरणांत गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईमुळे जिल्ह्यात बालविवाहाविरोधात प्रशासनाने कडक भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे.

दि. २६ एप्रिल २०२६ रोजी दहीफळ (ता. जि. बीड) येथे १५ वर्षीय मुलीचा बालविवाह होणार असल्याची गुप्त माहिती पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेत सापळा रचून कारवाई केली. लग्न मंडपात पोहोचून संबंधितांना ताब्यात घेण्यात आले.



पीडित मुलगी, तिचे आई–वडील, नवरदेव इरफान बेग अन्सार बेग (वय २४, रा. माळपुरी) तसेच त्याचे आई–वडील आणि इतर नातेवाईकांविरुद्ध पिंपळनेर पोलीस ठाण्यात बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अंतर्गत कलम ९, १० व ११ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्याच दिवशी जोला (ता. केज, जि. बीड) येथेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्याने पथकाने तत्काळ कारवाई करत मुलगी व तिच्या आई–वडिलांना ताब्यात घेतले. या प्रकरणी नवरदेव श्रीकांत जाधव व त्याच्या कुटुंबीयांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यापूर्वी दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सोनगाव (ता. जि. बीड) येथे १५ वर्षीय मुलीचा बालविवाह रोखून तिचे आई–वडील, नवरदेव व संबंधितांवर बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या तिन्ही प्रकरणांमध्ये पीडित मुलींना संरक्षणासाठी बालकल्याण समितीसमोर हजर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, मागील चार महिन्यांत –क्ष्ण पथकाने एकूण सात बालविवाह प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल केले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय पल्लवी जाधव व त्यांच्या पथकाने केली.

# ५ लाखांसाठी विवाहितेचा छळ

## ७ वर्षांच्या मुलासह घराबाहेर हाकलले

**बीड । प्रतिनिधी :**

ट्रॅक्टर खरेदीसाठी माहेराकडून ५ लाख रुपये आणण्याच्या मागणीवरून एका विवाहित महिलेला तिच्या ७ वर्षांच्या मुलासह घराबाहेर हाकलून देत दीर्घकाळ वैवाहिक छळ, मारहाण आणि मानसिक त्रास दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित महिलेने पोलीस अधीक्षक कार्यालयातील भरोसा सेल (महिला तक्रार निवारण कक्ष) येथे तक्रार अर्ज दाखल केला आहे.तक्रारदार दिपाली अजिनाथ माळी (वय २८, रा. अंत्रे, जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमारे आठ वर्षांपूर्वी त्यांचा विवाह अजिनाथ मुरलीधर मोरे यांच्याशी झाला होता. विवाहानंतर काही काळ संसार सुरळीत चालला; मात्र त्यानंतर पती, सासू, भाऊ आणि जाव यांच्या कडून सतत शारीरिक व मानसिक छळ सुरू झाला.पीडितेच्या म्हणण्यानुसार, तिला वारंवार शिवीगाळ, मारहाण, उपाशी ठेवणे तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात होत्या. पतीकडून संशय घेऊन मारहाण केली जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. तसेच पतीचे जावेसोबत अनैतिक संबंध असल्याचा गंभीर आरोपही तिने केला आहे. महिलेने पुढे नमूद केले की, तिला अनेक वेळा गंभीर मारहाण करण्यात आली असून यात तिच्या मणक्याला दुखापत झाली आहे. एका प्रसंगी कोयत्याने हातावर वार करून मनगट मोडण्यात आले, तर दुसऱ्या वेळी डोक्यावर गज मारल्याने तिला टाके घ्यावे लागले. अलीकडेच, ट्रॅक्टर खरेदीसाठी माहेराकडून ५ लाख रुपये आणण्याची मागणी करत सासरच्या मंडळींनी तिच्यावर दबाव टाकला. महिलेने असमर्थता दर्शविल्यानंतर तिचे दागिने काढून घेत, तिला आणि तिच्या ७ वर्षांच्या मुलाला अंगावरील कपड्यांसह घराबाहेर हाकलून देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे पीडितेचे वैवाहिक जीवन असुरक्षित झाले असून तिने संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणी पोलीस प्रशासनाकडून पुढील चौकशी सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

# जिल्हास्तरीय सोमवारी लोकशाही दिन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ४ मे २०२६ रोजी सकाळी १०–०० वाजता या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे.

लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.

लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल.ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे, आपले सरकार व पी.जी.पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीच्या अंतिम अहवालासह वेळेवर उपस्थित राहावे.

## खा.सोनवणे यांच्या गाडीला अपघात; दुचाकीस्वार गंभीर

बीड । प्रतिनिधी :

जिल्ह्यात आज घडलेल्या एका अपघातात खासदार बजरंग सोनवणे यांच्या वाहनाचा समावेश असून या अपघातात एका दुचाकीस्वाराला गंभीर दुखापत झाली आहे. तसेच या धडकेत दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी खा. सोनवणे यांची गाडी आणि दुचाकी यांच्यात जोरदार धडक झाली. अपघात इतका तीव्र होता की दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून त्याला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुका अद्याप सुरु आहे. दि.१ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिन आणि अमेरिका आणि इराण युध्दामुळे निर्माण झालेला इंधन तुटवडा महाराष्ट्रभर दिवसें दिवस वाढत आहे. त्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, वैयक्तीक आंदोलनकर्ते यांच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा–या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि.११ मे २०२६ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा–या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा–या कर्मचा–यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा–या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

# येळंबघाट येथे पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण शिबिर

## उत्साहात राणा डोईफोडे यांच्या पुढाकाराला प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी :**

मौजे येळंबघाट येथे पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात व मोठ्या प्रतिसादात पार पडला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पर्यावरण व हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नेकनूर मंडळ अध्यक्ष तथा जि. प. सदस्य राणा डोईफोडे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

या प्रशिक्षण शिबिरात शासनाच्या विविध महत्त्वाच्या योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. विशेषतः ड्खठ संकल्पनेद्वारे ग्रामीण युवक–युवतींना स्वावलंबनाच्या संधी कशा उपलब्ध करून देता येतील, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. लघुउद्योग, स्वयंरोजगार, बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण, तसेच ग्रामीण भागातील




उत्पन्नवाढीच्या संधी यावर सखोल चर्चा झाली.

याशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देताना प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, जल जीवन मिशन, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), तसेच पशुसंवर्धन व शेतीपूरक व्यवसायांसाठी असलेल्या अनुदान योजनांचा लाभ कसा घ्यावा याचे मार्गदर्शन करण्यात आले. शेतकरी, महिला बचत गट, बेरोजगार युवक यांना प्रत्यक्ष अर्ज प्रक्रिया, पात्रता निकष आणि आवश्यक कागदपत्रांबाबतही सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, जि. प. सदस्य भारत काळे, शांताराम डोरले, शरदजी इंगळे, बी एल ए वन आणि केज विधानसभा विस्तारक शांतीनाथजी डोरले भाजपा जिल्हा सचिव भाजपाचे युवा नेते सुनील मिसाळ, बालाघाट मंडळ अध्यक्ष अशोक रसाळ अमोल वडतीले (जिल्हा संयोजक), महादेव नागरगोजे (तालुका सरचिटणीस, बीड सौ. भाग्यश्री ढाकणे , ब्रह्मनाथ डोईफोडे, सरपंच सोमनाथ तांदळे, उपसरपंच चंद्रशेखर कवडे, सेवानंद कदम, सदाशिव खंदारे, अशोक शिंदे, तोंडे पिंटू, भटे बापूराव, अमोल तागड, प्रदीप वाघमारे, रावसाहेब डोईफोडे, सोशल मीडियाचे राजू शहाणे तसेच ग्रामीण), जिया शेख (अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष, नेकनूर मंडळ) आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक निलेश चंद्रकांतराव पुराणिक यांनी सचिन ऑफसेट, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड ४३११२२ येथे छापून साप्ताहिक बीड लक्ष्यवेध कार्यालय, माऊली वास्तुशिल्प अपार्टमेंट, विश्वास नगर, पांगरी रोड, बीड (महाराष्ट्र)येथे प्रकाशित केले आहे. संपादक : निलेश चंद्रकांतराव पुराणिक (मो.९६६५५५८३६९) या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद–विवाद बीड न्यायालयांतर्गत)

This Newspaper is Owner, Printer, Publisher, Editor Nilesh Chandrakantrao Puranik, Printed at Sachin Offset Printers, Subhash Road, Beed Tq & Dist Beed 431 122 and Published At weekly Beed Lakshyavedh Office Mauli Vastushilp Apartment, Vishwas Nagar, Pangari Road Beed (Maharashtra).431 122.